Peer Reviewed

ISSN 2454-8332

# IMPACT FACTS

Quarterly- Vol.7 • Issue 2 • 15 Dec. 2021 - 14 Mar.2022 • Rs.100/-

*International*
*Interdisciplinary Multilingual Research Journal*




**Editor**
**Dr.Kailas G.Kaninde**

# शुर स्वातंत्र्य सेनानी हुतात्मा जयवंतराव पाटील यांचे हैद्राबाद स्वातंत्र्य लढ्यातील योगदान

**प्रा.डॉ.वसंत कदम**
इतिहास विभाग प्रमुख,
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर, जि. नांदेड (महाराष्ट्र).

भारत भूमीच्या स्वातंत्र्याचा दिवस १८० वर्षानंतर उजडला १५ ऑगस्ट १९४७ रोजी मातृभूमीचे पारतंत्र्य संपुष्टात आले स्वतंत्र भारताचा तिरंगा ध्वज सर्वाकडे स्वाभीमानाने फडकू लागला एका बाजूला सारा हिंदुस्थान स्वातंत्र्यांचा आनंद उत्सव साजरा करतोय तर दुसऱ्या बाजूला आपल्या देशाच्या मध्यभागी असलेल्या हैद्राबाद संस्थानात स्वातंत्र्य भारताचा तिरंगा ध्वज फडकविण्यास निजामाने बंदी घातली आणि ११ जुन १९४७ रोजी हैद्राबाद राज्य स्वतंत्र राहणार असल्याची घोषणा केली. तर १३ ऑगस्ट १९४७ ला भारताच्या स्वातंत्र्याच्या पूर्वी दोन दिवस अगोदर दुसरे फर्मान काढून परराष्ट्राचा (भारताचा) ध्वज आमच्या हैद्राबाद देशात सार्वजनिक सभेच्या ठिकाणी फडकविल्यास ३ वर्षाचा कारावासाची शिक्षा व दंड ठोठावला जाईल असा हुकूम काढला.

येथील निजामी राजवटीत अन्याय व अत्याचाराची सिमाच उरली नव्हती. या काळात संस्थानातील रझाकारांनी राज्यात धुमाकूळ घातला होता. गोरगरीब जनतेच्या कत्तली करण्यात येऊ लागल्या. स्त्रीयांवर अत्याचार विनयभंग, अब्रु लुटण्याचे प्रसंग, हिंदूची घरे लुटली जाऊ लागली. रझाकार संघटनेचा प्रमुख कासीम रझवी वाटेल त्या वल्गणा करत होता. ३१ मार्च १९४८ रोजी त्याने भाषणात म्हटले, " जोपर्यंत हैदराबाद राज्यात मुस्लीमांना सार्वभौमत्व मिळणार नाही तो पर्यंत तलवार म्यानात घालू नका. एका हातात कुराण तर दुसऱ्या हातात तलवार घेऊन शत्रूचा नाश करा."

९ जुन १९४८ रोजी सय्यद कासीम रझवी भाषणात म्हणाले " राष्ट्राचे भवितव्य लेखणीच्या टोकानी नव्हे तर तलवारीच्या टोकानी घडत असते." या देशाचे भवितव्य राजकारणी मानसे काय घडविणार ? हे घडविणार आहेत रझाकार शिपाई... आणि मुसलमानांनी मनात आणले तर एकाही हिंदूचे डोके शिल्लक राहणार नाही. " हैदराबादच्या स्वातंत्र्याचा निर्णय यमुनेच्या काठी लाल किल्ल्यात होणार नाही, तर तो या मुस्सा नदिच्या काठी गोळकोंडयाच्या किल्ल्यात होईल."

अशा परिस्थितीमुळे येथील जनतेच्या मनात मोठा असंतोष निर्माण झाला. जनतेच्या असंतोषापुढे मोठमोठी राज्य भष्मसात झाल्या खेरीज राहत नाहीत. तरीही जनतेच्या मनातील असंतोष लष्कराच्या व रझाकाराच्या बळावर मोडण्याचा प्रयत्न निजामाने केला तितक्याच त्वेषाने हैद्राबाद संस्थानातील तरूणांनी निजामी सत्तेला आव्हान देऊन अन्यायी राजवटीच्या विरोधात सशस्त्र लढा उभारला याच लढ्यात नांदेड जिल्ह्यातील हदगांव तालूक्यातील वायपणा गावचे मुर्तीकर निधड्या छातीच्या हुतात्मा जयवंतराव पाटील वायपणेकर यांनी आपल्या परीसरात निजामाच्या विरोधात दंड थोपटले आणि मातृभूमीला निजामाच्या पारतंत्र्यातून मुक्त करण्याची शपथच घेतली.

खरं तर हदगांव तालूक्याला लढ्याची मोठी परंपरा लाभलेली आहे. इ.स. १८५७ च्या उठावापूर्वी या तालूक्यातील नाव्हा गावच्या हौसाजी व नौसाजी पाटील नाईक यांनी इ.स.१७९९ ते १८२० या काळात हैद्राबाद

संस्थानात पहिल्यांदा निजाम सरकारला जमीन महसूल देण्याचे नाकारून निजामी सत्तेच्या विरोधात बंड पुकारले. त्याचबरोबर पुंजप्पा बसप्पा जंगम तामसा व माधवराव पाटील आणि त्यांचे बंधू विक्रमसिंह पाटील वायपणेकर यांनी १९४३ साली धान्य वसुलीच्या निषेधार्थ हैद्राबादला शेतकऱ्यांचा मोर्चा नेला. हा मोर्चा संस्थानातील शेतकऱ्यांचा पहिला मोर्चा होता. या तालुक्याला ज्या पद्धतीने लढ्याची परंपरा आहे. त्याचप्रमाणे वायपणा गावच्या हुतात्मा जयवंतराव पाटील यांच्या घराण्याला देखील अन्याय विरूध्द चवताळून उठणे आणि खरी बाजू घेऊन लढत राहणे एवढेच माहित होते. जयवंतराव पाटील यांच्या वडीलांने व चुलत्याने निजामाच्या विरोधात उघडपणे कार्य सुरू केले होते. जयवंतराव पाटील यांचे वडील विक्रमसिंह हे नावाप्रमाणे पराक्रमी आणि धाडसी होते अन्याय व अत्याचाराविरूद्ध ते पेटून उठत निजामाविरूद्ध त्यांनी संघर्ष केला. निजामी सत्तेच्या विरोधात पाऊल उचल्यामुळे विक्रमसिंहना काही काळ कारावास भोगावा लागला, अशा लढाऊ वृत्तीचा वारसा लाभलेल्या घराण्यात जयवंतराव पाटील यांचा जन्म झाला. बालपणापासुनच अंगी धाडसी गुण असल्यामुळे निजामी सत्तेला आणि त्यांच्या लष्करांना तसेच त्यांने पोसलेल्या रझाकार आणि रोहिल्यांना ते कधीच घाबरले नाहीत. ते हुकूमशाहीचा तिरस्कार करीत, कोणतीही धाडसी कामे उत्साहने करीत एकदा निर्णय ठरला की माघार नाही किंवा तडजोड नाही. त्यांच्या घरची परिस्थितीही अतिशय चांगली असल्याने त्या पंचक्रोषीत त्यांच्या घराण्याचा दांडगा प्रभाव होता. त्यामुळे वाईटाचे खपवून घेऊ नये, वाईट करू नये मात्र कोणी वाईट करीत असेल तर त्याला धडा शिकवलाच पाहिजे, हे गुण त्यांच्या अंगी लहानपणापासूनच जाणवत होते.

जयवंतराव पाटील यांना जाणीव होती की पहिल्या क्रमांकाचे शत्रु निजामाने पोसलेले रोहोले आणि रझाकार आहेत आणि अशा शत्रु विरूद्ध लढण्यासाठी शरीर दनकट स्वसामर्थ्य आणि प्रबळ असले पाहिजे हे हो त्यांना माहित होते. कुटूंबाची कसलीही जबाबदारी त्यांच्यावर नसल्यामुळे पूर्णवेळ ते समाज सेवेत चळवळीत व लोकांच्या सुखदुखासाठी घालवीत ते उत्कृष्ट भजन म्हणत खरेतर या भजनाच्या माध्यमातुन त्यांनी जुलमी राजवटीच्या विरूध्द पैनगंगा आणि कयाधू नदिच्या खोऱ्यातील लोकांना जागृत करून उस्मानी सत्तेच्या विरूद्ध पेटून उठण्याचा संदेश त्यांनी तरूणांना दिला एवढेच नाहीतर, आसपासच्या गावातील तरूणांना संघटीत केले व या तरूणांचे नेतृत्व स्विकारून मातृभूमीच्या सेवेसाठी ऐन तारुण्यात त्यांनी हैद्राबाद मुक्ती लढ्यात स्वताला झोकून दिल्यानंतर या परीसरात निजामी सत्तेची दहशत निर्माण करणाऱ्या जलालखान या निजामाने पोसलेल्या रोहिल्यास मौजे आष्टी च्या भर चौकात ठार केले. ही घटना वाऱ्यासारखी सर्वदूर पसरली आणि पंचक्रोशीत जयवंतराव पाटलाच्या मर्दपणाची ओळख झाली. या परीसरातील रोहिल्यांचा बंदोबस्त त्यांनी केल्यामुळे पाटलांच्या धाडसी पणाचा परीचय लोकांना झाला. निजाम धार्जिन्या गुंडाचा बंदोबस्त केल्याची बातमी निजामापर्यंत जाऊन पोहचली तेच निजामाने जयवंतरावांना पकडण्यासाठी १५ हजार रुपयाचे बक्षीस ठेवले. परंतु वाघासारखा मर्द जयवंतरावांना पकडण्याचे धाडस कोणीही करू शकले नाही तेंव्हा निजामाने पोलीस आणि खास मिल्ट्री पाठवीली. परंतु ते निजामाच्या लष्कराच्या हाती लागले नाहीत. त्यामुळे निजामाने जयवंतराव पाटलांची सर्व जमीन कुळ लागल्याचे जाहीर करून या कुटूंबास भुमीहीन करावे असा बेत आणला. त्या वेळी या परीसराचा कारभार मुधोळ येथून चालत असल्यामुळे मुधोळ तालुक्याचा कोर्टाचा बिलीप शेतावर कब्जा सांगनारा कोर्टाचा हुकूम घेऊन वायपणा गावी आला. जयवंतराव पाटलाने मोठ्या धाडसी वृत्तीने निजामाचा वकील व त्यांच्या एकाही व्यक्तीस जिवंत वापस जाऊ देणार नाही अशी धमकी दिली. जयवंतराव पाटील यांच्यात असणारे दहा हत्तीचे बळ आणि त्यांची हिम्मत पाहून आल्या पावलाने बिलीफ निजामी सरदार आणि मिल्ट्री परत गेली. या घटनेमुळे जयंतराव पाटलांची किर्ती सर्वदूर पसरली.

भारतीय स्वातंत्र्यानंतर निजामाने हैद्राबाद राज्यात झेंडा फडकण्यास बंदी घातली त्यावेळेस जयवंतराव पाटलांनी वायपणा, कंजारा, कोळगाव, डोरली, आष्टी, तामसा, कोळी, सोनारी, पाटनुर, निवघा, चाभरा या गावी झेंडा सत्याग्रह केला. तसेच जंगल सत्याग्रह केला कामारी आणि तामसा येथील सरकारी गोदामाच्या लुटीत महत्त्वाची भूमिका निभावली आणि अन्नधान्य गोरगरीब जनतेत वाटले. अशा प्रकारे जयवंतराव पाटील यांच्या पराक्रमाच्या व धाडसांच्या आणि शौर्याच्या वार्ता सर्व दूर पसरल्या.

पुढे निजामासी संघटीत आणि सशस्त्र लढा दिल्या शिवाय पर्याय नाही हे ओळखून जयवंतराव पाटील यांनी आपल्या तुकाराम कंजारकर, विश्वनाथ दुगाळे, लखखासिंह राठोड, जानकिलाल राठी, गणपतराव पालकर, किशोर शहाणे अशा अनेक तरूण मित्रांना सोबत घेऊन उमरखेड येथील लष्करी कॅंप जाईन केला. यांच कॅंम्पच्या माध्यमातून निजामाला सळो की पळो करून सोडण्यासाठी अनेक धाडसी योजना आणल्या आणि त्या यशस्वीही केल्या हदगाव तालुक्यातील ३२ गावे १३ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र घोषीत करून १५ ऑगस्ट १९४७ रोजी या सर्व गावात हिंदूस्थानचा तिरंगा ध्वज फडकविण्यात आला याच प्रसंगी डोरली या गावी झेंडा सत्याग्रहाच्या वेळी अनेक स्वतंत्र विराना प्राणाची अहुती द्यावी लागली. याच कॅंम्पच्या माध्यमातून इस्लापूर पोलीस ठाण्यावर हल्ला करण्याचे ठरले. ३० जुन १९४८ हा दिवस निश्चित करण्यात आला. जयवंतराव पाटलानी इस्लापूर मोहिमेचे नेतृत्व स्वताकडे घेतले. २९ तारखेस पैनगंगा नदिच्या पलिकडील तिरावर बिटरगावला त्यांचा मुकाम होता. त्यांच्या सोबत या मोहिमेत जानकिलाल राठी, तुकाराम कंजारकर, लखखासिंह राठोड (लमानी), साहेबराव बारडकर, रांजणीकर, उत्तरवार, थेरबनकर यांच्या सह १३५ सैनीक सहभागी होते. पावसाळ्याचे दिवस होते पहाटे ४ ते ५ च्या सुमारास पोलीस ठाण्यावर हल्ला करण्याची योजना होती. पैनगंगा नदिला ही पुर आला होता. पाणी छाती पर्यंत होते. स्वातंत्र्य विरांनी अंधार रात्री एका हातात कपडे तर दुसऱ्या हातात शस्त्र घेतली, पाऊस आणि पुरामुळे पोलीस स्टेशन पर्यंत पोहचण्यास उशिर झाला थोडे उजडले. त्यामुळे माघारी जावे असे काहीनी सुचविले. परंतु वीर जयवंतरावानी माघार घेण्यास नकार दिला.

" जिकू अथवा मरू पण माघार नाही " जयवंतरावचे रक्त सळसळत होते, कधी एकदाचे ठाण्यावर हल्ला करू असे झाले होते. ठाण्यावर हल्ला करण्यासाठी चार तुकड्या केल्या. ठरल्या प्रमाणे बन्सीलाल तोष्णीवाल यांनी पिन बॉम्ब ठाण्यावर फेकला. परंतु स्फोट झालाच नाही. स्फोट झाल्यानंतर चारही तुकड्या एकदम हल्ला करणार होत्या. परंतु दुर्दैव आडवे आले. जयवंतराव पाटील हे ठाण्यावर सोमोरील बाजुने हल्ला करणार होते त्याप्रमाणे त्यांनी पो.स्टेशनच्या कुंपनावरून उडी घेतली आणि बंदूकीतून गोळ्या झाडण्यास सुरूवात केली. परंतु ठरल्या प्रमाणे सर्व काही घडले नाही. सर्व बाजूने एकाच वेळी हल्ला झाला नाही. त्यामुळे निजामी पोलीसांनी जयवंतराव पाटलांच्या दिशेने फायरींग सुरु केली. तरीही वाघासारखे जयवंतराव पाटील बंदुकीने गोळ्या झाडत निजामाच्या कांही पोलीसांना त्यांनी ठार केले. परंतु निजामी लष्कराच्या फायरींग पुढे ते टिकू शकले नाहीत. त्यांना अनेक गोळ्या लागल्या आणि मातृभुमीच्या स्वातंत्र्यासाठी या विर धाडशी योद्धाने आपल्या प्राणाची आहूती देऊन देशासाठी बलीदान दिले. त्यांचे सहकारी मित्र जानकीलाल राठी, तुकाराम कंजारकर लखखासिंग राठोड यांनाही या ठिकाणी विर मरण पत्कारावे लागले.

जयवंतराव पाटीलांच्या नसानसात स्वातंत्र्याचे रक्त सळसळत होते. उस्मानी सत्ता उलथून टाकण्यासाठी त्यांनी स्व:ताच्या जिवाची व कुटूंबियांची पर्वा केली नाही. मातृभूमीला स्वातंत्र्य करण्यासाठी त्यांनी सर्वस्वाचा त्याग केला. शेवटी भारत देशाच्या लष्करापूढे १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने शरणागती पत्कारली आणि हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाले.

याच हैद्राबाद स्वातंत्र्य लढ्यातील जयवंतराव पाटील यांचे बलीदान कोणीच विसरू शकणार नाही त्यांनी मातृभूमीसाठी केलेले समर्पन, त्याग पिढ्यानपिढ्या प्रेरणा देत राहील. अन्यायाविरूद्ध लढण्याचे बळ देत राहील.

**संदर्भ :-**


१. अंजनीकर भगवान, विर पुरूष हुतात्मा जयवंतराव पाटील, निर्मल प्रकाशन, नांदेड मार्च २००६.

२. डॉ.धोंडगे केशव शंकर., हैद्राबाद मुक्तीलढ्यातील मन्याड खोरी विजयी कारगील शौर्य गाथा, युनिक ऑफसेट प्रिंटर्स, नांदेड.

३. डॉ.कठारे अनिल व डॉ.नगराळे, मराठवाड्याचा इतिहास, कल्पना प्रकाशन नांदेड, नोव्हेंबर-१९९९.

४. ताडेवार राज., हैद्राबाद मुक्ती संग्रामातील हदगांव निर्मल प्रकाशन, नांदेड

५. जयवंतराव साहेबराव पाटील वायपणेकर, यांची प्रत्यक्ष मुलाखत, ऑगस्ट-२००३

६. जयदेवराव नागोराव पवार, पाथरड, यांची प्रत्यक्ष मुलाखत, सप्टेंबर-२००४